# शाळा व्यवस्थापन समिती

## शालेय विकासासाठी लोकसहभाग



## प्रस्तावना

भारतातील प्रत्येक बालकास दर्जेदार शिक्षण मिळणे हा प्रत्येक बालकाचा हक्क आहे. 'शिक्षण हक्क कायदा २००९' च्या अन्वये ६ ते १४ वयोगटातील प्रत्येक बालकास मोफत व सक्तीच्या शिक्षणाची हमी देण्यात आली आहे. मुल चांगले केव्हा शिकेल? जेव्हा त्याच्या शिक्षणासाठी त्याची शाळा, शिक्षक, पालक, व समाज हे सगळे घटक जागरूक असतील व एकत्रित प्रयत्न करतील. याच दृष्टीने शिक्षण हक्क कायद्यानुसार प्रत्येक शाळेत पालक, शिक्षक, विद्यार्थी व लोकप्रतिनिधी यांचा समावेश असणारी शाळा व्यवस्थापन समिती स्थापन करणे बंधनकारक केले आहे.




## १. समिती रचना



- **सदस्यसंख्या – १२ ते १६ (मुलांच्या पटसंख्येनुसार, सदस्य सचिव वगळून)**
- **समिती कार्यकाल २ वर्षे – २ वर्षानंतर पुनर्स्थापना**
- **७५% पालक – २५% इतर सदस्य – ५०% महिला**

- प्रत्येक शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था व अनुदानित शाळेत शाळा व्यवस्थापन समिती स्थापन करणे शिक्षण हक्क कायद्यानुसार बंधनकारक.
- ७५% सदस्य बालकांचे माता, पिता किंवा पालक.
- २५% सदस्य स्थानिक प्राधिकरण सदस्य, मुख्याध्यापक किंवा वरिष्ठ शिक्षक, शिक्षणतज्ज्ञ किंवा बालविकास तज्ज्ञ.

• एकूण सदस्यांच्या किमान ५०% सदस्य महिला

• २ विद्यार्थी प्रतिनिधींपैकी किमान १ मुलगी (स्वीकृत सदस्य- मतदानाचा अधिकार नाही.)

• समितीचे अध्यक्ष व उपाध्यक्ष पद पालकांतून निवडले जावे व दोन्ही पैकी किमान एक महिला असावी.

• शाळेचे मुख्याध्यापक हे समितीचे पदसिद्ध सचिव असतील.

## २. समिती स्थापना प्रक्रिया

• शाळा व्यवस्थापन समिती स्थापना / पुनर्स्थापना करण्यासाठी मुख्याध्यापकांद्वारा (पदसिद्ध सचिव) पालकसभा आयोजित करावी.

• पालकसभेसाठी किमान ७०% पालकांची उपस्थिती आवश्यक.

• महिलांच्या सहभागासाठी विशेष प्रयत्न केले जावेत.

• समितीची रचना, जबाबदारी व कार्य पद्धती यांची माहिती सर्वांना देण्यात यावी.

• शिक्षणाविषयी आवड असलेल्या तसेच शाळेसाठी वेळ देवू शकणाऱ्या उत्साही व कृतीशील पालकांना संधी द्यावी.

• समितीचे गठण राजकीय, सामाजिक दबावाखाली न करता खेळीमेळीच्या वातावरणात लोकशाही पद्धतीने करण्यात यावे.

• समिती सदस्यांतून अध्यक्ष व उपाध्यक्ष यांची निवड करण्यात यावी.

• शाळा व्यवस्थापन समिती सदस्यांची नावे शाळेत फलकावर दर्शनी भागात नोंदवली जावीत.

### समितीची कार्ये आणि जबाबदाऱ्या:

**मुख्याध्यापक:**

• शिक्षण हक्क कायदा कलम २३ नुसार पदसिद्ध सचिव

• समिती गठन आणि बैठका आयोजन

• इतिवृत्त लेखन

• तालुका स्तरीय शिक्षण यंत्रणेशी समन्वय

**शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष:**

• शिक्षक व पालक यांच्यातील समन्वय साधण्यासाठी प्रथम संपर्क

• शाळेच्या सूक्ष्म नियोजनात व निर्णय प्रक्रियेत सर्व सदस्यांना एकत्रित आणणे



- मासिक बैठका नियमित होण्यासाठी पुढाकार
- शिक्षक-पालक-विद्यार्थी शैक्षणिक आढावा व नियोजन बैठकीसाठी पुढाकार

**ग्रामपंचायत सदस्य:**

- गावातील तसेच समितीमधील प्रतिष्ठित व्यक्तिमत्व
- शाळा आणि ग्रामपंचायत यांच्यातील समन्वयात सक्रीय सहभाग
- ग्रामस्तरावरील शैक्षणिक शासकीय योजनांचा पाठपुरावा करणे

**पालक सदस्य:**

- प्रत्येक सदस्यांचा शालेय नियोजनात सहभाग निश्चित करणे
- पालकांचा आणि गावकऱ्यांचा शाळेकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलण्यासाठी प्रयत्न
- वर्गाचे पालकत्व स्वीकारून त्याप्रमाणे कार्य करणे

**महिला सदस्य:**

- आई ही मुलाची पहिली गुरू
- मुलांच्या गुणवत्ता वाढीत माता म्हणून भूमिका
- मासिक बैठकीस नियमित उपस्थित राहून सक्रीय सहभाग

१ डिसेंबर २०२० रोजी आलेल्या शासन परिपत्रकानुसार महात्मा गांधी रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून शाळेचा भौतिक दर्जा उंचावण्यासाठी करता येणाऱ्या १३ कामांची गरजेनुसार पूर्तता करवून घेण्यासाठी विविध पातळीवर पाठपुरावा करण्याचे काम शाळा व्यवस्थापन समितीने करणे अपेक्षित आहे.



**शिक्षण प्रेमी:**

- शिक्षणाबाबत जागरूक, उत्साही, गावातील व्यक्ती
- निवृत्त शिक्षक, समाज सेवक
- शैक्षणिक उपक्रम आखणी, पालक संवाद यांचे आयोजनात पुढाकार

**विद्यार्थी प्रतिनिधी:**

- मतदानाचा अधिकार नसला तरी समितीचा महत्त्वाचा घटक
- शाळेतील मुलांसाठीच्या नेमक्या गरजा शिक्षक व पालक यांच्या निदर्शनास आणून देणे
- बैठकीत स्वतःचे मत मांडण्याचा अधिकार
- बालसभा घेण्यासाठी पुढाकार

मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण हा प्रत्येक मुलाचा अधिकार आहे. मुल हे शाळेसोबतच आपल्या शाळेबाहेरील अनुभवातूनही शिकत असते. शिकण्यासाठी असे पूरक अनुभव मिळावेत व मुलांचे शिक्षण आनंददायी व अर्थपूर्ण व्हावे यासाठी शिक्षकांबरोबरच पालक व समाज यांचीही भूमिका महत्त्वपूर्ण ठरते. शाळा व्यवस्थापन समिती ही या घटकांची प्रतिनिधी आहे. मुलांच्या शिकण्यासाठी अनुकूल व प्रेरक वातावरण निर्माण व्हावे, यासाठी शिक्षक व समाज या दोन्ही घटकांच्या एकत्रित प्रयत्नांची गरज आहे. शिक्षण प्रक्रीयेतील या भागीदारांना अधिक सक्षम आणि प्रभावी बनविण्याच्या हेतूने ग्यानप्रकाश फाउंडेशन हे महाराष्ट्रातील चार जिल्ह्यांमध्ये (नंदुरबार, परभणी, सोलापूर, सातारा) काम करीत आहे.

gyan prakash FOUNDATION

**ग्यानप्रकाश फाउंडेशन**

३०२, 'ऑर्चर्ड'डॉ.पै.मार्ग, बाणेर,

पुणे - ४११०४५

इमेल - admin@gyanprakash.org

